# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : **diplomadesk10dte@gmail.com** Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2016-17/मान्यता/२१७
दिनांक :

2 MAR 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

**विषय : शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून पदविका अभ्यासकमाच्या नवीन संस्था सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने तपासणी करुन तपासणी अहवाल सादर करण्याबाबत...**

**संदर्भ :1. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : अप्रुव्हल /01(02) /2016.(लोकसत्ता दिनांक : 20.1.2016).**

**2. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2016-17/मान्यता/77, दिनांक : 22.1.2016.**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भ क्रमांक 1 वरील जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2016-17 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार आणि ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन (तंत्रशिक्षण संस्थेला मान्यता देणे) विनियम, 2012 नुसार ऑन लाईन पध्दतीने पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. सदर मुदत दिनांक 29.2.2016 रोजी संपलेली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक 2 वरील परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्याकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे ज्या संस्था प्रस्ताव सादर करणार आहेत, अशा संस्थांनी संबंधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे तात्काळ संपर्क साधून विहित मुदतीत, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण 2013/प्र.क्र.43/तांशि-4, दि. 21.8.2013 मध्ये नमूद विहित शुल्क भरुन तपासणी हेतूने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदमार्फत वेळोवेळी अद्ययावत करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापर्यंत प्रस्ताव सादर करुन तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत तपासणी करुन घ्यावी, अन्यथा संबंधीत संस्थांच्या प्रस्तावाची या संचालनालयामार्फत दखल घेतली जाणार नाही व अशा संस्थांची परिषद/ शासनाकडे शिफारस करण्यात येणार नाही असे कळविण्यात आलेले आहे.

तथापि, शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्याबाबतचे तपासणी अहवाल अद्याप या संचालनालयास अप्राप्त आहेत. तरी, आपल्या कार्यालयास प्राप्त शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावांच्या अनुषांगाने तात्काळ संबंधीत संस्थांची तात्काळ तपासणी करण्यात येवून सदर तपासणी अहवाल, संबंधीत संस्थेच्या प्रस्तावाच्या प्रतीसह दिनांक 5.3.2016 पर्यंत सादर करण्यात यावेत. तपासणी अहवाल सादर करण्यास उशिर झाल्यास त्याची जबाबदारी आपले कार्यालय व संबंधीत संस्था यांची राहील, याची नोंद घ्यावी.

**(डॉ. सुभाष महाजन)**
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई